# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

**CB/51/2025**

# प्रेसनोट

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक १७.०९.२०२५ |
|---|---|

**" जबरी चोरी करणा-या आरोपींना गुन्हेशाखा कक्ष ३ पनवेल कडुन अटक करून ०२ गुन्हे उघड "**

---

दिनांक १४/०९/२०२५ रोजी नवी मुंबई कळंबोली पोलीस ठाणे हद्दीमधील कळंबोली सिग्नल या ठिकाणी स्कुटी वरून आलेल्या तीन इसमांनी सिमेंट बल्कर चालकास वस्तरा दाखवून त्याचेकडे पैशांची मागणी करुन त्याचे कडील वन प्लस कंपनीचा मोबाईल फोन जबरीने चोरी केला होता. सदर प्रकरणी कळंबोली पोलीस ठाणे गु.र.नं.२१०/२०२५ बी.एन.एस.कलम ३०९(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

मा.पोलीस आयुक्त, श्री.मिलिंद भारंबे, मा.पोलीस सह.आयुक्त, श्री.संजय येनपुरे, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.दिपक साकोरे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ यांनी जबरी चोरीच्या गुन्हयांना प्रतिबंध करणेकामी व घडलेले गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

गुन्हे शाखा कक्ष-३ पनवेल यांनी सदर गुन्हयाचे तांत्रिक तपास, सीसीटिव्ही फुटेज, गोपनिय बातमीदार व मानवी कौशल्याचा वापर करून सदरचा गुन्हा हा खालील नमुद आरोपी इसमांनी केला असल्याचे निष्पन्न केले आहे.

**अटक आरोपीतांची नावे :-**

**1) प्रथमेश वासुदेव तरे, वय २४ वर्षे, सध्या रा.दिक्षीता बिल्डींग, रूम नंबर ३०, विचुंबे, ता. पनवेल, जि. रायगड, मुळ रा. भैया साहेब नगर, स्वॉल्पॅन रोड, अरूण वैदय मार्ग, वडाळा, मुंबई,**

**2) समीर श्रीधर पेडणेकर, वय २६ वर्षे, रा.प्रयागसिटी, विहिघर, ता. पननवेल, जि. रायगड, मुळ रा. जिजामाता नगर, २९० बी, काळा चौकी, मुंबई,**

**3) साहिल उदय खैरे, वय २३ वर्षे, रा.ए/३०४, ऐश्वर्या अपार्टमेंट, विचुंबे, ता. पनवेल, जि.रायगड**

**सर्व आरोपीतांना आज दि.१७/०९/२०२५ रोजी दुपारी १३:१४वा. अटक करुन मा.न्यायालयात हजर केले असता त्यांची दि.२०/०९/२०२५ रोजी पर्यत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर झालेली आहे.**

नमुद आरोपींना पुढील कारवाईकामी कळंबोली पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. नमुद आरोपींकडे केलेल्या तपासात त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे व कळंबोली पोलीस ठाणे हद्दीमध्ये जबरी चोरीचे गुन्हे केल्याचे कबुल केलेले आहे.

**- आरोपींकडुन उघडकीस आणलेले गुन्हे -**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम |
|---|---|---|
| १ | कळंबोली पोलीस ठाणे | २१०/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०९(४), ३(५) |
| २ | खांदेश्वर पोलीस ठाणे | २४४/२०२५ भा.न्या.सं.कलम ३१६(२), ३१८(४), ३(५) |

अटक आरोपींचा पुर्व इतिहास -

**समीर श्रीधर पेडणेकर**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम |
|---|---|---|
| १ | काळाचौकी पोलीस ठाणे, मुंबई | ९२/२०२१, एन.डी.पी.एस. कलम ८क, २७ |
| २ | काळाचौकी पोलीस ठाणे, मुंबई | ४४८/२०२१, म.पो.का. कलम १२२(ई) |
| ३ | काळाचौकी पोलीस ठाणे, मुंबई | ५२१/२०२१, एन.डी.पी.एस. कलम ८क, २७ |
| ४ | काळाचौकी पोलीस ठाणे, मुंबई | २४/२०२२, भा.द.वि. कलम ३९२ |
| ५ | काळाचौकी पोलीस ठाणे, मुंबई | ३५/२०२२, भा.द.वि. कलम ३९२, ४२७, ५०६, ३४ |
| ६ | काळाचौकी पोलीस ठाणे, मुंबई | ३५२/२०२३, भा.द.वि. कलम ३२६ |
| ७ | आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई | २९९/२०१८, भा.द.वि. कलम ३९४, ३४ |

**प्रथमेश वासुदेव तरे**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम |
|---|---|---|
| १ | वडाळा पोलीस ठाणे, मुंबई | ३१३/२०२० म.पो.का. कलम १२२ |
| २ | वडाळा पोलीस ठाणे, मुंबई | ३२२/२०२० भा.द.वि. कलम ३२६, ३२३, ५०४ |
| ३ | वडाळा पोलीस ठाणे, मुंबई | ६१/२०२१ म.पो.का. कलम १२२ |
| ४ | वडाळा पोलीस ठाणे, मुंबई | १७२/२०२३ भा.द.वि. कलम ३२६, ३२३, ३४१, ५०४, ५०६ |

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ०३ पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अविनाश काळदाते यांच्या नेतृत्वात सपोनि पवन नांद्रे, पोउपनि अभयसिंह शिंदे, पोहवा. रमेश शिंदे, प्रमोद राजपुत, निलेश पाटील, सागर रसाळ, इंद्रजित कानु, रूपेश पाटील, पो.ना. आजिनाथ फुंदे, विनया पाटील पो.शि. लवंकुश शिंगाडे, विक्रांत माळी, प्रसाद घरत यांनी केलेली आहे.

★★★★★★★★★★